# उल्हासनगर महानगरपालिका

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान मोहीमेंतर्गत वैयक्तिक घरगुती शौचालय योजना

## जाहीर आवाहन

**विषय: वैयक्तिक घरगुती शौचालय अनुदान प्राप्तीसाठी अर्ज सादर करणे.**

केंद्र शासनाच्या 'स्वच्छ भारत अभियान' च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी रू. ४००० केंद्र शासनाचे अनुदान, रू. ८००० राज्य शासनाचे अनुदान तर रू १०,००० महानगरपालिकचे अनुदान लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे.

**पात्रता**

१) शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने उघडयावर शौचालयास जाणारी कुटूंबे २) इन–सॅनिटरी शौचालयाचा वापर करीत असलेली कुटूंबे ३) एक शौचकुपाचे शौचालयाचा वापर करीत असलेली कुटूंबे.

**अर्ज भरण्याची प्रक्रिया**

१. **ऑनलाईन अर्ज भरणे–** www.swachhbharaturban.gov.in या संकेतस्थळावर Individual Household Latrine (IHHL) APPLICATION या कॉलमवरील APPLICATION वर क्लिक करून registration करावे प्राप्त Login ID व Password च्या साहयाने ऑनलाईन ॲप्लीकेशन करून प्राप्त पावतीची प्रिंट काढून घ्यावी. ही प्रिंट आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्जदार राहत असलेल्या क्षेत्राच्या प्रभाग समिती कार्यालयात जमा करावी.

२. **महापालिकेमार्फत अर्ज भरणे–** ज्या नागरीकांना ऑनलाईन पध्दतीद्वारे अर्ज भरता येणे शक्य नाही अशा नागरिकांसाठी महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जदार राहत असलेल्या क्षेत्राच्या प्रभाग समिती कार्यालयात अर्जदाराने स्वत: अर्ज भरून घ्यावा.

**अर्ज भरण्यासाठी आवश्यक बाबी**

**१) अर्जदाराचा फोटो २) मोबाईल क्रमांक ३) ई–मेल आयडी ४) रहिवांसाचा पत्ता ५) आधार कार्ड क्रमांक ६) बॅंक खाते पुस्तिका ७) शौचालयाची सद्यस्थिती.**

**तरी उपरोक्त बाबींचा अवलंब करून नागरिकांनी वैयक्तिक शौचालय योजनेचा लाभ घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.**

**श्रीमती अपेक्षा पाटील**
**महापौर**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**मनोहर हिरे**
**आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**